# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०१४.


## दादा दामले (dadadamle@gmail.com)


=============================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना वरिष्ठाच्या त्रासास सामोरे जावे लागेल. पण ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. घरी जीवनसाथीच्या अनारोग्यास व मतभेदास सामोरे जावे लागेल. या राशीच्या काही मंडळीना ताप येणे, अपचन होणे, अन्य पोटाचे विकार, मूत्राशय विकार अशापैकी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काहींना कुसंगतीमुळे होणारे आर्थिक नुकसान व मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. लहरी स्वभावावर नियंत्रण ठेवू शकला नाहीत तर अकारण खर्च होऊन आर्थिक चिंता त्रस्त करतील. काहींना जिवावरच्या प्रसंगाला तोंडद्यावे लागण्याची शक्यताही जाणवते. जपा. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होण्याची शक्यता आहे. शत्रू राशीतील शनीमुळेअसमाधानकारक घटना, अपेक्षाभंग यांमुळे मन अशांत राहील. त्यामुळे एखादा चिंता करण्यासारखा आजार होणेही शक्य आहे. जपा. सुखस्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काहींना अपेक्षेनुसार खरेदीविक्रीचे व्यवहार करता येणे शक्य होईल. पण नातेवाईक मंडळीचा त्रासही सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासामिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे नोकरी-व्यवसायात जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लेखक मंडळीचे लिखाण ग्रंथ रूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल होईल. मात्र आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेने करणेच हिताचे होईल. कोणावरही फाजील विश्वास टाकणे अंगाशी येईल. द्रव पदार्थ व्यापारी, मानसोपचारतज्ज्ञ यांना काळ प्रगतिकारक होईल. बुद्धी स्थिर, विचार व मन शांत राखता आले तरच फारसे अनारोग्य होणार नाही. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास होणे शक्य दिसते. काहीजणाना मूळव्याधीचा त्रास होणे संभवते. शारीरिक कष्ट व मनस्ताप यामुळेही

थकवा येणे शक्य आहे. जपा. अपघात भय आहे. जपा. वीज, पाणी यापासून धोका संभवतो. जपा. महिन्याचा उत्तरार्ध वैवाहिक सुखाचे दृष्टीने तापदायकठरेल. जीवनसाथीचे अनारोग्य, जीवनसाथीशी होणारे वाद, मतभेद यांमुळे अपेक्षित वैवाहिक सुख लाभण्याची शक्यता कमी आहे. कुमार्गी लोकांपासूननुकसान होणे संभवते. तसेच भावंडांकडूनही त्रास होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. विविध कारणांनीअपेक्षित कौटुंबिक व संतती सुखसमाधान मिळेलच याची खात्री देता येत नाही. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असल्याचा अनुभव येईल. विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवत असले तरी गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय अशा प्रकारचे नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्र गतिकारक व लाभदायक होईल. नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. मात्र विरोध, भांडणतंटे, मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मानसिक स्वास्थ्य लाभेल. काही जणांना सूचक स्वप्ने पडतील, तर काही जणांना परदेशगमनाची संधी लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. काही जणांना प्रिय जनांच्या दूरत्वामुळे मानसिक अस्वस्थता येईल. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील मतभेद, वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. कारण अपयश येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीची मंडळी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकली तर त्यांना या महिन्याचा काळ अतिशय अनुकुल व लाभदायक होईल. रवि-मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असल्याने उष्णता विकारांचे आजार होण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळीना त्यांच्याबाबतच्या अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्ती स्थिर, शांत व प्रसन्न राखण्याचा प्रयत्न करावा. पैसे, वस्तू

गहाळ होणे, चोरी होणे अशापैकी घटना घड्णेही संभवते. जपा. मुलांपैकी कोणास आजार, कोणास वाटणारा निरुत्साह, कोणाची आचरण विषयक समस्या अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे शक्य दिसते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रह ांच्याअनुकुलतेने परिस्थिती आटोक्यात राहील व काही मनोनुकुल घटना घडून कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य लाभेल. शेतीवाडी असणारांना त्य ापासूनभरपूर लाभ होईल. या राशीच्या काही व्यक्ती प्रशंसेस पात्र ठरतील. या राशीच्या नोकरदार मंडळीना वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. पण कोणतेही बौद्धिक , शास्त्रीयसंशोधानात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील तर काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. शक्यतो जलप्रवास करू नका. जलभय, विषभय आहे. राहूमुळे भावंडसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर बावन्न श्लोकी गुरुरित्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच नोकरी-व्यवसायाच्या दृष्‌टीनेअनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्य ा उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. कुटुंबात वाद, मतभेद, कलह अशा कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य य ात बाधा येणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत केवळ शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. मनस्ताप ामुळेचशारीरिक अनारोग्य होणे संभवते. हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्ती स्थिर व शांत राखण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. नेपच्यूनम ुळे विविध कारणांनी दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. तसेच मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे विक्षिप्तव मनस्ताप देणार े आचरण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यता नाही. सदैव सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहेच. या राशीच्या काही मंडळीना त्वचारोग, मुखदंत विकार, रक्तविकार अशापैकी कसल्या तरी आजाराशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना कष्ट परिश्रम करूनही अपेक्षित अर्थलाभ न झाल्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होणे संभवते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती व मन:शांती मिळू शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल सुखकारक होईल.

**(६) कन्या -** या महिन्यापासून या राशीच्या मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होता

आहेत, ही सुखाची बाब आहे. तरी सुद्धा नोकरी-व्यवसायाव्यतिरिक्त जीवनाचा अन्य क्षेत्रात विरोधी परिस्थितीलाच तोंड द्यावे लागेलसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात फसवणूक, आर्थिक नुकसान, वाढता खर्च अशापैकी कारणांनीत्रस्त व्हाल. त्यामुळे कौटुंबिक सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे अनेक मनोनुकुल घटना घडून कौटुंबिकसुखात फारशी बाधा येणार नाही. या राशीच्या काही मंडळीना उत्तम नोकरी तर काहींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळीना नोकरीत सुखसमाधान लाभेल, आर्थिक लाभ होणेही संभवते. त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील. या राशीच्याव्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होणेही संभवते. पण काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावरसंबंधी वाद मनस्ताप देतील. त्यामुळे गैरसमज वाढून कुटुंबात असमाधानकारक घटना घडतील. जपा. काही मंडळीना काल्पनिक चिंता त्रस्त करतील तर काहींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. जीवनसाथीचेलहरी विक्षिप्त आचरण, दोघांतील मतभेद, भांडणे यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येउ शकेल .जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशा कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. लाभस्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रगती साधणे शक्य होईल. विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरतील, इच्छा आकांक्षा पूर्ण होतीलव नवे मित्र मिळतील. गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

(७) तुळा - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल व भावनाशील झाले असावे, असे वाटते. त्यामुळे त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होत असावे, असे वाटते अशा अवस्थेत आर्थिक चिंता, फसवणूक अशा घटना घडल्या तर त्याचा परिणाम म्हणून अनारोग्य होणारच. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणाऱ्यानी तर मन व बुद्धी शांत राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार बळावण्याची शक्यता जाणवते. अति विचार करू नका. मेंदूवर ताण पडेल. त्यामुळे डोकेदुखी वा मेंदूचे विकार होणे संभवते. जपा. कौटुंबिक जीवनात शक्यतो वाद, मतभेद, भांडणे टाळा. कुसंगतीपासून दूर राहा. मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्थिती सुधारेल व हिंमत, महत्वाकांक्षा

वाढल्याचा अनुभव येईल. हातून कर्तबगारी घडेल. मात्र शक्यतो प्रवास करू नका. इजा, दुखापत होणे संभवते. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र वैद्यकीय व्यवसाय असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असल्याचा अनुभव येईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुख व मन:शांती मिळू शकेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनात बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. हनुमान उपासना अनुकूल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीच्या शनि ग्रहाच्यासाडेसातीचा १/३ काळ समाप्त झाला आहे. तरीही सर्वबारा राशीमध्ये मंगळ ग्रहाच्या मेष व वृश्चिक राशीच्या मंडळीना शनि ग्रहाच्या साडेसातीचा त्रास अधिक प्रमाणात सहन करावा लागतो. ही गोष्ट ध्यानात घेउन या राशीच्या मंडळीनी सतत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळ व्यतीत केला पाहिजे, या महिन्याच्या काळात शनि-रवि-मंगळ हे सर्व दादा ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील व त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवत े रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष जपावे. काही मंडळीना नेत्रविकार , घसा, मान, दाढा दुखण्याचा तसेच पोटविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. आर्थिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळीना संततिविषयक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता दिसते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना बढती, अधिकारपद असे काही मिळू शकेल. उच्च चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच अध्यात्म आणि कलाक्षेत्रातील मंडळीनाही अनक्रमे म:शांतीस व कालाविषकारास काळ अनुकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळीना नव्या संधी प्राप्त होतील; तर काहींना प्रवासयोग येतील. श्रीगणे श व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या प्रारंभापासूनच शनी ग्रहाच्या साडेसातीस प्रारं भ होत आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडत गेल्यास उदास, निराश न होता मनावर ताबा ठेवून, व सहनशीलतेने वागून काळ व्यतीत केल्यास गुरु-शुक्र या शुभ

ग्रहांच्या अनुकुलतेने ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद अनुभवू शकाल. रवी-मंगळ हे दोन्ही अग्नि तत्वाचे ग्रह या महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होणार असल्यामुळे अकारण चिता करू नका. श्रम , दगदग करू नका. त्या मुळे मन अस्वस्थ राहील राहील व गहरे नैराश्य येईल. त्यातून शारीरिक-मानसिक अनारोग्य होण्याचीच शक्यता दिसते. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. विचाराच्या तंद्रीत किंवा फोनवर संभाषण करत वाहने चालवू नका. प्रतिकूल काळ केव्हा दगा देईल ते सांगता येत नाही. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावाधानतेनेच करा. महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल होणार असल्याने जे काही साध्य करावयाचे ते पूर्वार्धातच साधून घ ेण्याचा प्रयत्न करा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध बढती, पगारवाढ, कौतुक या दृष्टीने अनुकूल होईल. पण वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तसा प्रयत्न कटाक्षाने टाळाच. तसेच जुगार, लाटरी यापासून दूर राहा. आहे त्या परिस्थितीत सुखाने कालक्रमणा करा. कौटुंबिक वाद, गैरसमज टाळा. तरच गुरू-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. जन्म कुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही जणांना अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. काही मडळीना परदेशगमनाचे किंवा जलप्रवासाचे योग संभवतात. श्रीह नुमान उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा बराचसा काळ अनुकुल असला तरी गैरसमजुती, भांडण तंटे, मानहानी, आर्थिक जबाबदाऱ्या पार पडण्याची चिंता अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच काही जुनी विस्मृतीत गेलेली मनस्ताप देणारी प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचाही असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. असे घडले नाही तर संपूर्ण महिन्याचा काळ सुखानंद संतोषकारक असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राह कांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. गुरू-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकार क व लाभदायक होईल. कठीण वाटणाऱ्या समस्या ासहजसोडवू शकाल. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध , स्नेहसंबंध जुळून येतील. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह अनुकुल होईल व सतत मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभ ेल शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. बढती, मानाचे स्थान, उच्च पद, प्रशंसा , अर्थलाभ असे काही तरी होणे संभवते. . स्वतंत्र व्यवसाय असणाराना आपल्या व्यवसायात प्रगती करणे सहज शक्य होईल. राहूमुळे

विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य यात बाधा येणे शक्य आहे. जपा. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीची वर्तमान मनस्थिती अत्यंत कोमल झाली असावी, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदना अति शीघ्र होत असतील व मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. तसेच स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यताही जाणवते. त्यामुळे विक्षिप्त आचरण होत असले पाहिजे. अशा मनस्थितीत मौन व्रत धारण केलेत तर अकारण कोणाचाही अपमान होणे टळेल. अविचाराने खर्च होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी खूप परिश्रम करावे लागतील. घरातील वडील मंडळीचा विरोध सहन करावा लागेल. मित्रांशी वितुष्ट येईल. मानसिक ताण सहन करावा लागेल. पण अशा परिस्थितीत या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. शत्रू राशीतील शनीमुळे व्यापार-व्यवसायात हानी, पीछेहाट होणे शक्य दिसते. जपा. पण शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळीना काळ अनुकूल असल्याचा अनुभव येईल थोरामोठ्यांच्या ओळखीतून लाभदायक घटना घडतील. आर्थिक लाभ होतील. पण कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र अडचणी, मनस्ताप सहन करतच काळाशी समझोता करावा लागेल. पण गुरु ग्रहाची शुभ दृष्टी असल्यामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. आरोग्य उत्तम राहील. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(१२) मीन** - सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तरी ते अपमानास्पद वाटत असावे. ज्यांची लहान मुले या जन्मराशीची आहेत त्यांनी मुलांच्या व्रात्यपणाकडे बारकाईने लक्ष देणे अगत्याचे होईल. वाहनांपासून धोका संभवतो. या राशीच्या मंडळीना सतत कसली तरी काल्पनिक चिंता त्रस्त करील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. जपा. शनि - रवि हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. पण यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते , गुप्त पोलीसखाते अशापैकी नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे बुद्धी भ्रष्ट होण्याची शक्यता असते. जपा. वाममार्ग धन सहज

मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतील वाद, भांडणामुळे वा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात बुध - शुक्राच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====OOOOO=====